## आबासाहेब पाटील रेंदाळ सहकारी बँक लि. रेंदाळ

**प्रधान कार्यालय गट नं १६५१, हिंदू चौक, श्रीरामनगर, मेन रोड,**
**रेंदाळ ता. हातकणंगले जि. कोल्हापूर**
**पोट कार्यालय - वसुली अधिकारी (महाराष्ट्र शासन प्राधिकृत)**

### स्थावर मिळकतीचा जाहिरनामा

महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चा नियम १०७ (११) (इ) प्रमाणे

खालील तपशिलातील नमूद मालमत्ता जाहिर लिलावाद्वारे विक्री करावयाची आहे. जी की, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९१ मा. सहकार न्यायालय क्र २ कोल्हापूर व सिंधुदुर्ग यांचेकडून दि. २६/०३/२०२४ रोजी मिळालेल्या हुकूमनामा क्र ४१५/२०२३ नुसार आबासाहेब पाटील रेंदाळ सहकारी बँक लि, रेंदाळ या बँकने कर्ज यकबाकी वसुली करण्यासाठी जप्त केलेली असुन प्रत्यक्ष ताब्यात घेतलेली आहे.

| अ. नं. | मालमत्ता धारक | मालमत्तेचे वर्णन | आरक्षित किंमत | अनामत |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. रयाजी गणपती पाटील | मौजे रेंदाळ येथील शेतजमीन खाते नं १२२२५ गट नं २२ चे क्षेत्र ०हे०३ आर पोटखराब क्षेत्र हे०.०१ आर एकूण क्षेत्र ०हे २९ आर आकार २ रु ९५ पैसे त्या पैकी स्थावर जप्ती आदेशाने मनाई केलेले क्षेत्र ० हे ०३ आर. व त्यावरील आर.सी.सी. इमारत | ४३,१४,०००/- | २,१५,७००/- |

१. श्री. रयाजी गणपती पाटील यांचे कर्ज खात्याची एकूण कर्ज येणे बाकी रु १०,७८,४८२/- द.सा.द.शे. १०% व्याजदराने दि. २८/०२/२०२५ रोजी पर्यंत व्याज व इतर कर्ज वसुली खर्चासहीत.

२. कर्जदाराचे नांव- श्री. रयाजी गणपती पाटील

३. जामीनदारांची नांवे - १) श्री. अनिलकुमार दत्तात्रय रेंदाळकर व २) श्री. विजय अशोक कुंभार

४. नमुद मालमत्ता ही जसे आहे, जेथे आहे, आणि जसे आहे, जे आहे आणि तेथे जे आहे या तत्वावर लिलाव करणेत येईल.

५. नमुद मालमत्ता हि आरक्षित किंमतीपेक्षा कमी किंमतीस विक्री केली जाणार नाही.

६. लिलावाच्या अटी व शर्ती असलेली बोली प्रपत्र अथवा अन्य कोणतीही माहीती बँकेच्या प्रधान कार्यालयात वसुली अधिकारी (महाराष्ट्र शासन प्राधिकृत) यांचे पोटकार्यालयात कामाच्या दिवशी तसेच निरीक्षणाच्या तारखेस रक्कम रु. १,०००,०० भरून मिळेल. मिळकतीचे निरीक्षण दिनांक २१/०३/२०२५ रोजी सकाळी ११.०० ते ५.०० दरम्यान करणेत येईल.

७. अ.क्र ६ मध्ये नमुद केल्याप्रमाणे नियोजित दिनांकास मिळकतीचे निरीक्षण करता येईल. या व्यतिरिक्त दि. २४/०३/२०२५ ते दि. २६/०३/२०२५ या कालावधिमध्ये कामकाजाच्या दिवशी व कार्यालयीन वेळेत पूर्व संमतीने पुढील क्रमांकावर संपर्क करून मिळकतीचे निरीक्षण करता येईल. फोन नं ९९७०७४३३११

८. इच्छुक बोलीदारांना अनामत रक्कम भरणा करून लिलाव प्रक्रीयेमध्ये भाग घेता येईल. अनामत रक्कम भरणेचा तपशिल (IDBI Bank Ltd Br Assembly Raod Kolhapur, A/c Name - Abasaheb Patil Rendal Sahakari Bank Ltd Rendal, Type Of A/c Current Account - A/c No 116102000005180, IFSC Code - IBKL0000116.)

९. अनामत रक्कमेची R.T.G.S. / N.E.F.T. आबासाहेब पाटील रेंदाळ सहकारी बँक लि., रेंदाळ या नावे जमा करावी अनामत रक्कम हि व्याजमुक्त असेल. त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही अथवा मिळणार नाही.

१०. बोलीदारांने ओळखपत्रासह लिलावात स्वता भाग घेणे बंधनकारक आहे किंवा बोलीदाराच्या वतीने उचितरीत्या प्राधिकृत प्रमाणित व्यक्ती यांचे त्यांचे प्रतिनीधी म्हणून भाग घेऊ शकतील, अनामत रक्कमेसह ओळखपत्र आधार कार्ड व पॅन कार्ड किंवा प्राधिकृत पत्र जोडणे आवश्यक आहे.

११. लिलावाची प्रक्रीया आबासाहेब पाटील रेंदाळ सहकारी बँक लि., रेंदाळ प्रधान कार्यालय येथे दुपारी ३.३० वाजता चालू होईल.

१२. यशस्वी बोलीदारांने अनामत रक्कमेसह अंतिम बोली रक्कमेच्या १५% रक्कम लिलावाच्या वेळेपासून २४ तासाचे आत भरणा करणे आवश्यक आहे.

१३. बोली रक्कमेच्या १५% रक्कमेचा भरणा करणेस यशस्वी बोलीदारांने कसूर केल्यास इसारा अनामत रक्कम जप्त होईल.

१४. अनामत रक्कमेसह १५% रक्कमेच्या व्यतिरिक्त उर्वरीत ८५% रक्कम यशस्वी बोलीदाराने लिलावाच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत पूर्णतः भरावयाची आहे. अन्यथा तत्पूर्वी भरलेल्या सर्व रक्कमा जप्त करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

१५. यशस्वी बोलीदारास स्वखर्चाने नमुद मिळकत स्वताच्या नावांने रजिस्टर करून घ्यावी लागेल. (मुद्रांक शुल्क, नोंदणी फी, व इतर अनुषंगिक खर्च)

१६. मिळकती सापेक्ष उपजित सर्व आकार, कर, सोसायटी देणे आणि किंवा अन्य दायित्वे/देयके यशस्वी बोलीदाराने भरावयाची आहेत.

१७. कोणतेही कारण न देता, कोणताही किंवा सर्व प्रस्ताव स्विकारण्याचे किंवा फेटाळण्याचे तसेच लिलाव पुढे ढकलण्याचे, रद्द करण्याचे सर्व अधिकार वसुली अधिकारी राखून ठेवत आहेत. आणि कोणतीही पुर्व सुचना न देता जाहीर लिलाव विक्रीच्या अटी व शर्ती सुध्दा बदलू शकतात.

१८. वाजवी मुल्य (आरक्षित किंमत) राखीव किंमतीपेक्षा कमी बोली बोलणाऱ्याला लिलावात भाग घेता येणार नाही.

१९. कोणताही वाद उदभवल्यास केवल तो, मे. सहकार न्यायालय क्र २ कोल्हापूर न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात येईल.

**दिनांक १९/०३/२०२५**
**ठिकाण - रेंदाळ**

**सही/-**
**वसुली अधिकारी**
**आबासाहेब पाटील रेंदाळ सहकारी बँक लि. रेंदाळ**